राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळातील शिक्षिका व महिला शिक्षिकेतर कर्मचारी यांना प्रसूती रजा मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसएसएन-१००९/(३८६/०९)/माशि-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ मार्च, २०१०.

वाचा :- १) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक: अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-६, दिनांक २४ ऑगस्ट, २००९.
२) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१.

शासन निर्णय :-राज्य शासनाच्या महिला कर्मचा-यांसाठी प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविण्याबाबत वित्त विभागाने दि.२४ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षिका व महिला शिक्षिकेतर कर्मचारी यांना प्रसूती रजा १८० दिवसापर्यंत खालील अटीस अधीन राहून मंजूर करण्यात यावी.

१) या सुविधेचा लाभ २ अपत्यापुरताच मर्यादित राहिल. प्रसूती रजा मंजूर करण्याच्या इतर शर्ती पूर्वीप्रमाणेच या पुढेही लागू राहतील.

२) या सुविधेचा लाभ दि २४/८/२००९ दिनांकापासून लागू राहिल.

३) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील नियम १६ मधील पोट-नियम १४ (अ) व (ब) तसेच पोट नियम १५, १६ व १७ यांचे कसोशीने पालन करणे अत्यावश्यक आहे.

४) महिला शिक्षण सेवकांना तसेच महिला शिक्षिकेतर कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांचा शिक्षण सेवक कालावधी पूर्ण करीत असताना प्रसूती रजा घ्यावी लागल्यास शिक्षण सेवक पदाचा कालावधी त्या प्रमाणात वाढविणे आवश्यक आहे.

२. याबाबत शिक्षण संचालक, पुणे यांनी योग्य ते आदेश संबंधीतांना तात्काळ पारीत करावेत व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मध्ये योग्य ती सुधारणा करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा.

३.	सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७८ / व्यय-५ दि. ८ / ३ / २०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००३०८१९३७११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.मा.भट्टलवार)
सह सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, (माध्य.व उच्च माध्य./ प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
सर्व शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
सर्व लेखाधिकारी (शिक्षण विभाग)
महालेखापाल, १/२ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
महालेखापाल, १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
मुंबई लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हयाचे कोषागार अधिकारी
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
वित्त विभाग / नगर विकास विभाग /ग्रामविकास व जल संधारण विभाग/ समाजकल्याण विभाग/अदिवासी विकास विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
संचालक, माहिती व जनसंपर्क यांना योग्य त्या प्रसिध्दीसाठी
निवड नस्ती माशि-२